पुण्यनगरी दि. 30/01/2026

# राष्ट्रीय युवा साहित्य संमेलन स्थगित

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील वङ्मय मंडळ व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे शुक्रवार, दि. ३० रोजी पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते; मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे हे साहित्य संमेलन स्थगित करून पुढे ढकलण्यात आले, अशी माहिती प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, वाङ्मय मंडळप्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर यांनी दिली.

तरुण भारत संवाद • शुक्रवार, ३० जानेवारी २०२६

# युवा साहित्य संमेलन लांबणीवर

**कोल्हापूर** : येथील विवेकानंद कॉलेजमध्ये आज शुक्रवार दि. ३० रोजी आयाजित करण्यात आलेले पाचवे राष्ट्रीय आंतर महाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन पुढे ढकलण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर ३ दिवस शासकीय दुखवटा असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेज मधील वाड्.मय मंडळ आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने आज शुक्रवारी ३० रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु हे संमेलन आता पुढे ढकलण्यात आले आहे, याची नोंद घ्यावी, असे आवाहन विवेकानंद महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, वाडमय मंडळ प्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले आहे.

...1.26

Thorat
30-1-2026